## Maharashtra University of Health Sciences, Nashik
## Nursing Faculty

### Information of Subject-wise Intake as per College & University Recognition
### Permitted Seat-Matrix Chart for Academic Year 2026 - 2027

**Name of College: -TANISHQ COLLEGE OF NURSING, SOMALWADA NAGPUR**

| UG Degree/PG Degree | | Intake as per University /Council | Max. Seats Permitted by MUHS as per Teacher: Student Ratio (1:5) |
|---|---|---|---|
| | | Degree | Degree |
| **UG Degree :** B. Sc (Nursing) | | 60 | NA |
| P. B. B. Sc (Nursing) | | 60 | NA |
| **PG Degree :** M.Sc. (Nursing) Total Aggregate | | - | NA |
| Community Health Nursing | | - | NA |
| Obstetric and Gynecological Nursing | | - | NA |
| Child Health Nursing | | - | NA |
| Psychiatric Nursing/Mental Health Nursing | | - | NA |
| **Medical Surgical Nursing** | Cardio Vascular & Thoracic Nursing | - | - |
| | Critical Care Nursing | - | - |
| | Oncology Nursing | - | - |
| | Neurosciences Nursing | - | - |
| | Nephro- Urology Nursing | - | - |
| | Orthopaedic Nursing | - | - |
| | Gastro Enterology Nursing | - | - |
| | | | |
| | | | |

**Original Scan Copy respect to above sanctioned intake as per Government GR, MNC, MUHS, If Available INC Permission Must be attached for above Information on Website**

**Any Other, Please Specify:-**

**Date:** ............................

**Dean/ Principal/Stamp & Signature**

PRINCIPAL
Tanishq College of Nursing
Somalwada, Nagpur

Chairman of LIC | Member Of LIC | Member Of LIC

बी.एससी. (नर्सिंग) अभ्यासक्रम महाविद्यालयास मान्यता देण्याबाबत.

श्री महावीर एज्युकेशन सोसायटी, जि. नागपूर संचलित तनिष्क कॉलेज ऑफ नर्सिंग, जि. नागपूर.

## महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर-२०२२/प्र.क्र.२०९/२२/शिक्षण-१

९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.

दिनांक: - ०९ फेब्रुवारी, २०२३.

वाचा : १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीजी/युजी/पी-५/१४४४/२०२१, दि.२९.१२.२०२१.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१, दि. २८ फेब्रुवारी, २०१८.

३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.डीएमईआर-११०१४/६९/२०२२-सीईटीआयटी,दि.१०.०७.२०२२ व दि.१४.१०.२०२२

**प्रस्तावना:**

श्री महावीर एज्युकेशन सोसायटी, जि. नागपूर संचलित तनिष्क कॉलेज ऑफ नर्सिंग, जि. नागपूर या महाविद्यालयाचा बी.एससी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(१) येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी बृहत आराखड्यानुसार सदर प्रस्तावाची शिफारस केली होती. संदर्भ क्र.(२) येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समिती व आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी उक्त संस्था बी.एससी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचेकडून प्राप्त शिफारस विचारात घेऊन, उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एससी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी संदर्भ क्र. (३) अन्वये सक्षमता तपासणी समितीच्या अहवालाच्या आधारावर केलेली शिफारस विचारात घेऊन, श्री महावीर एज्युकेशन सोसायटी, द्वारा

Scanned with CamScanner

संचलित तनिष्क कॉलेज ऑफ नर्सिंग, खसरा नं. २७/१, एम२, सोगलवाडा लेआऊट, नागपूर वार्ड क्र. ७५, डिवीजन - नागपूर, ता. जि. नागपूर या महाविद्यालयास सन २०२२-२३ साठी ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एससी. (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरू करण्यास पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी बी.एससी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ (महाराष्ट्र अॅक्ट १९८८ चा VI) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम / अधिनियमाच्या आधारे तसेच मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्था, त्यांच्या महाविद्यालयात शासकीय वैद्यकीय/दंत/ परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियतवयोमानुसार सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही.

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी बी.एससी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने प्रथम तुकडी बाहेर पडेपर्यंत दरवर्षी शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

९) सदर मान्यता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१०) संस्थेने बी.एससी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करू नयेत.

१२) संस्थेला गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ च्या कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (वै.शि.), यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, ८ वा मजला, एनबीसीसी सेंटर, प्लॉट नं.२, कम्युनिटी सेंटर, आखला फेज-१, नवी दिल्ली-११० ०२०.
६. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट-४००००१.
१०. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३ रा मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
११. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
१२. अध्यक्ष/सचिव, श्री महावीर एज्युकेशन सोसायटी, नागपूर.
१३. निवडनस्ती (शिक्षण-१).

PRINCIPAL
Tanishq College of Nursing
Somalwada, Nagpur

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी-दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक-४२२००४, Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik- 422 004
Tel: (0253)-2539198,200,268 307 Student Helpline: (0253)-2539111/6659111/100
Web.: www.muhs.ac.in E-mail : academicnursing@muhs.ac.in

MUHS

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M.B.B.S. M.D. (Forensic Medicine) D.N.B. L.L.B.
Registrar

Outward No.: MUHS/Acad/E5/UG/155148/ 1162 /2025

Date: 30 /~~05~~ 07 /2025

To,
**The Principal**
Shree Mahavir Education Society,
Tanishq College of Nursing,
Khasra No.27/1, M2, Somalwada Layout,
Nagpur, Ward No.75, Division-Nagpur,
**Tal. Nagpur, Dist. Nagpur- 440 005.**

**Sub.: Continuation / Extension of Affiliation for Academic Year 2025-26 (Nursing UG)**
(Issued under provision No. 05 & 13 of University Direction No. 02/2016)
**Ref.:** Academic Council Resolution No. 293/2025, dated 23/04/2025

Sir / Madam,

With reference to above cited subject, I am directed to communicate that, as per the University laid down procedure & your proposal for Continuation of Affiliation & / or Extension of Affiliation, the Hon'ble Academic Council is pleased to grant Continuation of Affiliation & / or Extension of Affiliation for Academic Year 2025-26 as per the provision u/s 68 and 65(4) of MUHS Act, 1998, for the Under Graduate Course/s of your College with intake Capacity **B.Sc. Nursing - 60** student to the permission granted by central Government / INC / State Government (as applicable)

Following deficiencies shall be strictly complied within Thirty Days, from the date of receipt of this letter.

**(i) Teaching Staff:**

| Year | Prof. cum Principal | | | Prof. cum Vice Principal | | | Professor | | | Associate Professor | | | Assistant Professor | | | Tutor | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | R | E | D | R | E | D | R | E | D | R | E | D | R | E | D | R | E | D |
| Third Year | 01 | 01 | - | 01 | - | 01 | - | - | - | 02 | 01 | 01 | 03 | 03 | - | 11 | 11 | - |

**Req.** : Indicates no. of required teaching staff as per norms.

**Ext.** : Indicates no. of Existing approved teaching staff.

**Def.** : Indicates no. of deficit teaching staff as per Council norms.

1) Required teaching staff as per norms.
2) Required teaching staff as per the MUHS Academic Council Resolution No 293/2025 is Total Teaching Staff should be 70% & above and Approved Teaching Staff should be 60% & above.
3) Total Teaching staff available in your College is 88.88%.
4) Approved Teaching staff available in your College is 88.88%.

P.T.O

**(ii) Deficiencies in Hospital for compliance : Nil**

**(iii) Deficiencies in College for compliance : Nil**

**(iv) Deficiencies in Hostel for compliance : Nil**

**(v) Other Deficiencies , if any: Nil**

**(vi) Other:**

a. The College shall submit Affidavit in the prescribed format as per Academic Council's Resolution No. 229/2013 (format attached).

b. For those UG / PG qualifications that are not yet recognized by the Central Govt., it shall be mandatory for the College to apply to the Central Council / Commission through Central Govt. and ensure that "Permitted" / "Not Recognized" qualifications are enlisted in "Recognized Qualifications", failing which University shall not grant Continuation of Affiliation to such courses from ensuing Academic Year & no student shall be admitted in such courses.

**(vii) Settlement of advances(s) / dues of any section of University including affiliation fees if pending with the College, please submit within 03 months, otherwise no action will be taken on teacher's proposal for approval/Recognition received from your College.**

**Important Note**:

1) This Continuation / Extension of affiliation is issued for the A.Y. 2025-2026 subject to the permission of Indian Nursing Council / Commission and / or State Government and if the permission is declined by the said authorities this Continuation / Extension of Affiliation shall be treated as cancelled. The College is not authorized to admit the students for 1st Year of the course until receipt of permission of the Indian Nursing Council / Commission and / or State Government.

2) The admission shall be done through the Competent Authority only.

Thanking you.

PRINCIPAL
Tanishq College of Nursing
Somalwada, Nagpur

Yours,

29-7-25
**Registrar**

**Copy to:-**

1. The Competent Authority, Admission Regulating Authority, Mumbai.
2. The Controller of Examinations, M.U.H.S., Nashik.
3. The Dy. Registrar, Eligibility Dept., M.U.H.S., Nashik.
4. The HOD, Computer Dept., M.U.H.S., Nashik.

**पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबत.**

श्री. महावीर एज्युकेशन सोसायटी, न्यु इंदिरा कॉलनी, भगवान नगर, नागपूर, जि. नागपूर संचलित तनिष्क कॉलेज ऑफ नर्सिंग, राजीव नगर, सोमलवाडा, नागपूर, जि. नागपूर.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर-२०२५/प्र.क्र.२२१(ई-१११८९४०)/२५/शिक्षण-१
९ वा मजला, नवीन मंत्रालय, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
दिनांक: ०९.०६.२०२५.

वाचा : १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-५/२२७१/२०२४, दि.३०.१२.२०२४.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एनयुआर २०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१, दि.२८.०२.२०१८.

३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.डीएमईआर ११०१४/११/२०२५-सीईटीआयटी, दि.१९.०३.२०२५.

**प्रस्तावना:**

श्री. महावीर एज्युकेशन सोसायटी, न्यु इंदिरा कॉलनी, भगवान नगर, नागपूर, जि. नागपूर संचलित तनिष्क कॉलेज ऑफ नर्सिंग, राजीव नगर, सोमलवाडा, नागपूर, जि. नागपूर या संस्थेचा पी.बी.बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(१) च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली होती. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समितीने उक्त संस्था पी.बी.बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. सक्षमता तपासणी समिती व आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांची शिफारस विचारात घेऊन, उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह पी.बी.बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

सक्षमता तपासणी समिती व आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांची शिफारस विचारात घेऊन, श्री. महावीर एज्युकेशन सोसायटी, न्यु इंदिरा कॉलनी, भगवान नगर, नागपूर, जि. नागपूर संचलित तनिष्क कॉलेज ऑफ नर्सिंग, राजीव नगर, सोमलवाडा, नागपूर, जि. नागपूर या संस्थेस

सन २०२५-२६ साठी ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह पी.बी.बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रम सुरू करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी पी.बी.बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८ चा VI) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम / अधिनियमाच्या आधारे तसेच मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून त्यानुसार शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्था, त्यांच्या महाविद्यालयात शासकीय वैद्यकीय/दंत/ परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियतवयोमानुसार सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही.

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने प्रथम तुकडी बाहेर पडेपर्यंत दरवर्षी शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्थेस विना- अनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली असल्याने संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

९) सदर मान्यता कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या शिफारशीस अनुसरून देण्यात येत आहे.

१०) संस्थेने पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

१२) संस्थेला गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात

येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ च्या कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(तुषार पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, ८ वा मजला, एनबीसीसी सेंटर, प्लॉट नं.२, कम्युनिटी सेंटर, आखला फेज-१, नवी दिल्ली.
५. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
८. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई.
९. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३ रा मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१०.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई
११.प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
१२.कक्ष अधिकारी (शिक्षण-२), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.अध्यक्ष/सचिव, श्री. महावीर एज्युकेशन सोसायटी, न्यु इंदिरा कॉलनी, भगवान नगर, नागपूर.
१४.निवडनस्ती (शिक्षण-१).

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
MUHS
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) 2539244/6659244/241/242- Student Helpline:0253-539111/6659111/100
Website: www.muhs.ac.in, E-mail: planning@muhs.ac.in

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M.B.B.S, M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
Registrar

No. MUHS/PB/UG/Nursing/P-5/527/2025 Date: 23/07/2025

To,
**The President / Secretary,**
Shree Mahavir Education Society,
New Indira Colony, Bhagwan Nagar,
Dist. Nagpur – 440 027
**Phone No.** – 8766648424
**Email** – tanishqpbnursing@gmail.com

<u>Sub</u>: **Grant of First Time Affiliation for the Academic Year 2025 – 26.**

Sir,

As per the provision of section 65 (4) of Maharashtra University of Health Sciences Act 1998, I am directed to inform you that, on the basis of the Local Inquiry Committee report and Permission from Academic Council vide Resolution No. 349/2025 the Hon'ble Vice Chancellor is pleased to Grant First Time Affiliation to, **"Tanishq College of Nursing, Rajiv Nagar, Somalwada, Nagpur, Dist. Nagpur - 440025."** for the Academic Year **2025-2026.** However, this affiliation is subject to the following conditions:-

1) The intake capacity shall be **60** Students for **P.B.B.Sc Nursing Course.**
2) Fulfilment of deficiencies within 3 months from the date of issuance of this letter as communicated by the University separately.
3) Rules and Regulations made by Indian Nursing Council, New Delhi, Govt. of Maharashtra and the University, as amended from time to time, will be binding on the College.
4) The College should obtain approval of teachers from the Maharashtra University of Health Sciences, Nashik.
5) The College should obtain the permission for admitting the students from the Admission Regulating Authority, Mumbai.
6) The College should obtain approval of fee schedule for the admission of the students from the Fee Regulating Authority, Mumbai.
7) This First Time Affiliation is Valid for Academic year 2025-26 only.

P.T.O.

8) The next batch of students shall not be admitted unless continuation of affiliation from the University is obtained by the College.

9) It is mandatory for the College / Institute to register on AISHE portal and submit the required data on AISHE portal time to time.

Yours,

23-7-25

Registrar

Copy to :-

1) The Secretary, Indian Nursing Council, 8th Floor, NBCC Center, Okhla Phase-I, New Delhi – 110020.
2) The Secretary, Medical Education & Drugs Department, Mumbai
3) The Director, Directorate Medical Education & Research, Mumbai.
4) The Secretary, Maharashtra Nursing Council, Mumbai
5) The Commissionerate, CET Cell, 8th Floor, New Excelsior Building, A. K. Nayak Marg, Fort, Mumbai - 400 001.
6) The Chairman, Admission Regulating Authority, 8th Floor, New Excelsior Building, A. K. Nayak Marg, Fort, Mumbai - 400 001.
7) The Chairman, Fees Regulating Authority, 3rd Floor, 49, Kherwadi, Ali Yawar Jung Marg, Bandra (E), Mumbai – 400 051.
8) The P.S. to Hon'ble Vice Chancellor, MUHS, Nashik.
9) The P.S. to Pro Vice Chancellor, MUHS, Nashik
10) The Registrar, MUHS, Nashik.
11) The Controller of Examinations, MUHS, Nashik.
12) The Finance and Accounts Officer, MUHS, Nashik
13) HOD, Academic Section – 2, MUHS, Nashik.
14) HOD, Eligibility Section, MUHS, Nashik.
15) HOD, Computer Section, MUHS, Nashik.
16) HOD, Student Welfare Section, MUHS, Nashik.
17) HOD, Special Cell, MUHS, Nashik.